सोलापूर तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

# धारूर महाविद्यालय व तहसील कार्यालयाच्या वतीने वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**धारूर दि.२१ सप्टेंबर**

किल्ले धारूर तालुक्यातील जहागीर मोहा येथे धारूर तहसील कार्यालय आणि एन सी सी विभाग कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विविध वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बालाघाटाच्या रांगेत डोंगराळ भागातील जहागीर मोहा गावे. यावेळी धारूरचे तहसीलदार श्री.दत्ता भारस्कर, धारूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गोपाल काकडे एन सी सी विभाग प्रमुख मेजर डॉ.मिलिंद गायकवाड, वृक्ष लागवड किती महत्त्वाची आहे तहसीलदार दत्ता भारस्कर यांनी यावेळी व्यक्त केले की, वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन अभियान ग्रामस्थांमध्ये चांगल्या पद्धतीने राबविणे ही काळाची गरज आहे. यावेळी एन सी सी कॅडेट्स, ग्रामस्थ व इतर वृक्षप्रेमी उपस्थित होते.

# धारूर महाविद्यालय व तहसील कार्यालयाच्या वतीने वृक्षारोपण संपन्न



**किल्ले धारूर । वार्ताहर**

तालुक्यातील जहागीर मोहा या गावांमध्ये धारूर तहसील कार्यालय व एनसीसी विभाग कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जहागीर मोहा या गावांमध्ये डोंगराळ भागामध्ये विविध वृक्षाच्या वृक्षरोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या उत्साहात हे वृक्षारोपन करण्यात आले.

याप्रसंगी धारूरचे तहसीलदार दत्ता भारस्कर धारूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे एनसीसी विभागाचे विभागप्रमुख मेजर डॉ. मिलिंद गायकवाड व एनसीसी कॅडेट, ग्रामस्थ व इतर वृक्षप्रेमी यांची उपस्थिती होती याप्रसंगी वृक्ष लागवड ही किती महत्त्वाचे आहे वृक्ष हेच पर्यावरणाचा महत्त्वपूर्ण घटक आहेत मानवी जीवन जर संपन्न व आरोग्य संपन्न करायचे असेल तर वृक्षाची लागवड करणे आवश्यक आहे असे मत धारूरचे तहसीलदार दत्ता भारस्कर यांनी व्यक्त केले याप्रसंगी ग्रामस्थांमध्ये वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन ही मोहीम चांगल्या पद्धतीने राबवणे व त्याचा संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले या कार्यक्रमाला धारूर व परिसरातील नागरिक यांची उपस्थिती लक्षणीय होती.